# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २५.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०५.२०२६ चे ००.१० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पेट्रो मोबाईलने पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या माहितीवरुन, ते मालधक्का रोड, इतवारी येथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नवाब शहा उर्फ काल्या रहीम शहा वय ३३ वर्षे, रा. सीए रोड, कालुशहा मस्जिदजवळ, आजमशहा चौक, नागपूर असे सांगीतले. आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०५.२०२६ चे २२.४५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बंदेनवाज नगर, रहमान कुरेशीचे घराजवळ गोवंशीय जनावरे यांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता त्या ठिकाणी एकुण १५ लहान मोठी गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. जनावरांचे मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी शेख रहमान शेख उस्मान कुरेशी वय ४० वर्ष रा. गली क्र. ८, बंदेनवाज नगर, यशोधरानगर, नागपूर याने त्याची असल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातून एकुण १५ गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे २,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त गोवंशीय जनावरे यांना धंतोली गोरक्षण समिती येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. राहुल इंगोले यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर आरोपीविरूध्द कलम ५(अ),५(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम—१९६०, अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०५.२०२६ चे ०८.५० वा. ते ०९.३० वा. चे दरम्यान, सदर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, लाल शाळेच्या आत, गड्डीगोदाम येथे गोवंशीय जनावरे यांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता त्या ठिकाणी एकुण १० लहान मोठी गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता कोणीही काही सांगितले नाही. घटनास्थळावरुन एकुण १० गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे १,९०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गोवंशीय जनावरे यांना धंतोली गोरक्षण समिती येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी सफौ. दुर्गेश ठाकूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि अंकुश वाकडे ९६७३९६३४६४ अज्ञात आरोपीविरूध्द कलम ५,५(ब),९,९(ब), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम — १९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३,११(१) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम—१९६०, सहकलम ११८,११९ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे कपीलनगर:—** दिनांक २५.०५.२०२६ चे ००.०५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतील पाटणकर चौक येथील शासकीय भिक्षेकरी स्विकार केंद्र येथे वास्तव्यास असलेले अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३३ वर्षे वयाचे यांची प्रकृति खराब झाल्याने त्याना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २५.०६.२०२६ चे ०२.४५ वा. डॉक्टरांनी त्याना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि दिपक पाटील यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :—** दिनांक २४.०५.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, दिघोरी रींग रोड, आराधना बस स्टापमागील बगिच्यामध्ये एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाचे वर्णन— रंग सावळा, बांधा—साधारण, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशी बारीक व पांढरी असून मृतकाने अंगात फक्त काळया रंगाचा बरमुडा घातलेला आहे. मृतदेह पुढील कार्यवाहीकरीता मेडीकल हॉस्पिटल मर्चुरी येथे पाठविण्यात आलेला आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी सपोनि संतोष सपाटे यांनी पोलीस ठाणे वाठोडा येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** कु. सुलोचना चंद्रलाल ककोडीया वय १९ वर्षे रा. चिंतामण राठोड यांचे घरी, नरसाळा, आखरी बस स्टॉप झोपडपट्टी, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक २३.०५.२०२६ चे ०४.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ,

उंची– ५ फुट, केस– काळे व लांब, डोळे–काळे, अंगात– चॉकलेटी रंगाचा कुर्ता व पायजामा घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलते. ओळखचिन्ह – नाकात नथनी घातलेली आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** कु. प्रणिता नितीन मानकर वय १७ वर्षे रा. भिवसनखोरी, भिमसेना नगर, बादल किराणा दुकानासमोर, गिट्टीखदान, नागपूर ही दिनांक ०५.१२.२०२५ चे ११.०० वा. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ४ इंच, केस– काळे, डोळे–काळे, अंगात– सलवार सुट घातलेला आहे. भाषा– मराठी व हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** कु. सेजल सतिश ओगनिया वय १७ वर्षे रा. विजय मोहाडीकर यांचे घरी, प्लॉट क्र. ५०, पुर्व बालाजीनगर, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक १७.०५.२०२६ चे १७.३० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट, केस– काळे, डोळे–काळे, अंगात– लाल रंगाचा टॉप व लाल रंगाचा प्लॅजो घातलेला आहे. भाषा– मराठी व हिंदी बोलते.


कु. सुलोचना


कु. प्रणिता


कु. सेजल

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०८, नागपुर. | ३०३०१८/ २००७ | कलम ३९२, ३४ भा.दं.वि. | विजय उर्फ राजा मथुराप्रसाद बुंदेले वय २१ वर्ष रा. शांतीनगर प्राथमिक शाळेजवळ, नागपुर | २८.०५.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**दिनांक २५.०५.२०२६ सोमवार**

# प्रेस नोट

मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर श्री. डॉ. रविंद्रकुमार सिंगल, मा. आयुक्त म.न.पा. नागपुर श्री. विपीन ईटनकर, मा. सह पोलीस आयुक्त नागपुर शहर श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपुर शहर श्री. राजेंद्र दाभाडे यांचे मार्गदर्शनाखाली व सहकार्याने आणि मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. १) श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, नागपूर शहर यांच्या विशेष प्रयत्नांनी, पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस ठाणे सोनेगांव, सिताबर्डी, अंबाझरी, तहसील आणि सक्करदरा हद्यीतील तलाव व मार्केट परिसरात पेट्रोलींगकरीता सेग—वे (बॅलेन्सिंग स्कुटर) मिहान इंडिया लिमीटेड, नागपूर प्राधिकरण यांचे सौजन्याने देण्यात आलेल्या आहेत.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय करीता एकुण ०५ सेग—वे (बॅलेन्सिंग स्कुटर) प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा १) सोनेगाव तलाव परिसर २) अंबाझरी फुटाला तलाव परिसर ३) सिताबर्डी मार्केट परिसर ४) सक्करदरा ताजबाग परिसर व ५) तहसिल ईतवारी मार्केट परिसर येथे वापर करण्यात येणार आहे. याकरीता नियुक्त करण्यात येणारे पोलीस अंमलदारांना प्रशिक्षणही देण्यात आलले आहे.

सेग—वे (बॅलेन्सिंग स्कुटर) व्दारे केल्या जाणाऱ्या पेट्रोलींग दरम्यान अनाउन्समेन्ट करून, तलाव तथा मार्केट परिसरात होणाऱ्या गर्दीला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच, घडणाऱ्या घरफोडी व चोरी यासारखे गुन्हे तथा महिलासंबंधीत गुन्हे नियंत्रणात राहुन कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होणार आहे. सेग—वे वाहने उपलब्ध झाल्याने, नागपुर शहर पोलीस दलात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भर पडली आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**